# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : १२१२४/ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ४ सप्टेंबर, २०२०.

: : प रि प त्र क : :

महाराष्ट्र विधानमंडळाचे आगामी सन २०२० चे पावसाळी अधिवेशन सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होत आहे.

कोविड-१९ या विषाणूचा प्रादूर्भाव लक्षात घेवून मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत :-

सोमवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी पासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होणाऱ्या विधानमंडळाच्या अधिवेशनाकरीता उपस्थित राहणाऱ्या सन्मा.सदस्यांनी "कोरोना" विषाणू संसर्ग नसल्याबाबतचा अधिवेशनाच्या अगदी लगतपूर्वीचा अधिकृत प्रयोगशाळेचा आरटी-पीसीआर चाचणीचा अहवाल या सचिवालयाकडे सादर करणे आवश्यक राहील" असा निर्णय मंगळवार दिनांक २५ ऑगस्ट, २०२० रोजी झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने विधान भवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वारा नजीक मा.पीठासीन अधिकारी, मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, तसेच, मंत्री परिषदेतील सर्व मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते व दोन्ही सभागृहांचे सर्व सन्मा. सदस्य यांच्याकरीता दिनांक ५ व ६ सप्टेंबर, २०२० रोजी सकाळी ०८.०० ते सायं ०८.०० वाजेपर्यंत RT-PCR कोरोना चाचणी करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

तसेच, उक्त सर्व मान्यवरांना असेही कळविण्यात येते की, ते त्यांच्या वास्तव्याच्या नजीक असलेल्या अधिकृत प्रयोगशाळेचा दिनांक ५ सप्टेंबर, २०२० किंवा तद्नंतर केलेला RT-PCR कोरोना चाचणीचा अहवाल देखील या सचिवालयास सादर करु शकतात व जवळपास तशी सुविधा उपलब्ध होत नसल्यास विधान भवन, मुंबई येथे उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेल्या व्यवस्थेचा वापर करु शकतात. सन्मा.सदस्यांनी अधिवेशनास उपस्थित राहण्याकरिता येतेवेळी प्रवास करित असताना कोरोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी वाहनचालक व एक स्वीय सहायक अशा दोनच व्याक्तींना सोबत ठेवावे. त्या दोघांची चाचणी केलेली असावी व त्यांचा अहवाल निगेटीव्ह असेल तरच त्यांना प्रवासात सोबत ठेवावे.

तसेच, मा.पीठासीन अधिकारी, मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेता, सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी त्याचप्रमाणे, मंत्रालयातील व विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना देखील उपरोक्त सुविधा उपलब्ध असून विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करण्याकरीता वरीलप्रमाणे चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

विधानमंडळ सचिवालयामार्फत विधान भवन, मुंबई येथे करण्यात आलेल्या चाचणीचा अहवाल विधानमंडळ सचिवालयामार्फत अपलोड करण्यात येईल. मात्र ज्यांनी विधान भवन येथील चाचणी केंद्राव्यतिरिक्त इतर अधिकृत प्रयोगशाळेतून RT-PCR कोरोना चाचणी केली असेल त्यांनी त्यांचा अहवाल विधानमंडळाच्या http://mls.org.in/mla-report/covid-test.html या लिंक वर अपलोड करावा. सदरहू लिंक विधानमंडळाच्या http://mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. तसेच, विधान भवन येथे प्रवेश करीत असताना सामाजिक अंतर राखणे सोईचे व्हावे याकरीता नियोजित वेळेपूर्वी उपस्थित राहावे.



(राजेंद्र भागवत)
सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत :

(१) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.

(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

(४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

(५) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

(६) मा.विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद/महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.

(७) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी.

(८) मंत्रालयीन सर्व विभागातील प्रधान सचिव/ सचिव

(९) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी, विधान भवन, मुंबई.

(१०) समादेशक अधिकारी, अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

(११) विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, विधान भवन, मुंबई.

(१२) व्यवस्थापक, उपहारगृह, विधान भवन, मुंबई

(१३) मालमत्ता व्यवस्थापक, ग-२ कक्ष, विधान भवन, मुंबई.

(१४) शाखा अभियंता, सा.बा.विभाग (स्थापत्य), विधान भवन, मुंबई.

(१५) शाखा अभियंता, सा.बा.विभाग (विद्यूत), विधान भवन, मुंबई.

याची प्रत कार्यवाहीसाठी

(१) मुख्य सुरक्षा अधिकारी, विधान भवन, मुंबई.

(२) उप सचिव, संगणक शाखा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,मुंबई.